# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

## **हुतात्मा शिवराम हरी राजगुरू जयंती**


सकाळ
३ रविवार, २६ ऑगस्ट २०१८

### सहिष्णू समाजनिर्मितीची गरज : देशमुख

राजगुरुनगर, ता. २५ : "क्रांतिकारकांचे पुरोगामी, समाजवादी, स्वतंत्र भारताचे स्वप्न साकार आणण्यासाठी विज्ञाननिष्ठ, विवेकवादी, सहिष्णू समाज निर्माण होण्याची गरज आहे," असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात हुतात्मा राजगुरूंच्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक कोंडीभाऊ टाकळकर, 'स्वराज्य रक्षक संभाजी' मालिकाफेम देवेश मेढगे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. बापूसाहेब चौधरी, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रा. अशोक थिगळे उपस्थित होते.

लक्ष्मीकांत देशमुख म्हणाले, "विद्यार्थ्यांनी राजगुरूंसारख्या हुतात्म्यांचे स्मरण ठेवायला हवे. आता तुम्हाला देशासाठी बलिदानाची गरज नसून तुम्ही ज्या क्षेत्रात काम करता तेथे उत्तम आणि प्रतिभावंत असण्याची आवश्यकता आहे. मर्यादित राजकीय पक्ष मतांच्या राजकारणासाठी जातीपातीचं, धर्मांधतेचं विष पेरत असून, तरुणांनी हा धोका ओळखून



राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरूंच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना लक्ष्मीकांत देशमुख.

विध्वंसक शक्तींनी बंधुभाव वाढीस लावायला हवा."

पुढारी | पुणे, रविवार २६ ऑगस्ट २०१८

### समर्थ भारतासाठी प्रयत्न करा : लक्ष्मीकांत देशमुख

राजगुरुनगर : प्रतिनिधी

देशाच्या सुवर्णयुगाचे स्वप्न साकार करण्यासाठी तरुणांनी समर्थ, समृद्ध आणि विकसित भारत निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची गरज आहे, असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राजगुरूंच्या शतकोत्तर दशकपूर्ती जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात देशमुख बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक कोंडीभाऊ टाकळकर, अभिनेता देवेश मेढगे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. बापूसाहेब चौधरी, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रा. अशोक थिगळे आणि विद्यार्थी उपस्थित होते.



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात बोलताना लक्ष्मीकांत देशमुख.

देशमुख म्हणाले, की विद्यार्थ्यांनी राजगुरूंसारख्या हुतात्म्यांचे स्मरण ठेवायला हवे. आता तुम्हाला देशासाठी बलिदानाची गरज नसून, तुम्ही जे करता त्यात उत्तम आणि प्रतिभावंत असावे. क्रांतिकारकांचे पुरोगामी, समाजवादी, स्वतंत्र भारताचे स्वप्न साकार आणण्यासाठी विज्ञाननिष्ठ, विवेकवादी, सहिष्णू समाज निर्माण होण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

#### सामाजिक बांधिलकीची कामे करावीत

राजगुरुनगरवासीयांना हुतात्मा राजगुरूंच्या भूमीत राहण्याचे भाग्य लाभल्याने मिळाले आहे. या संधीचे सोने करताना इतरांपेक्षा जास्त देशभक्ती व सामाजिक बांधिलकीची कामे करावीत, अशी अपेक्षाही देशमुख यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन व प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी आभार मानले.

लोकमत पुणे, बुधवार, दि. २९ ऑगस्ट २०१८

# समर्थ भारतासाठी प्रयत्न करा : देशमुख

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : भारत देश सत्तरीत असला, तरी वयोमानानुसार तरुणांचा देश आहे. देशाच्या सुवर्णयुगाचे स्वप्न साकार करण्यासाठी तरुणांनी सदैव प्रयत्नशील राहण्याची गरज अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केली. हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात राजगुरुंच्या शतकोत्तर दशकपूर्ती जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर,



हुतात्मा राजगुरुंच्या शतकोत्तर दशकपूर्ती जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात बोलताना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख.

संचालक कोंडीभाऊ टाकळकर, 'स्वराज्य रक्षक संभाजी'फेम देवेश मेदगे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. बापुसाहेब चौधरी, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रा. अशोक थिगळे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

लक्ष्मीकांत देशमुख म्हणाले, की विद्यार्थ्यांनी राजगुरुसारख्या हुतात्म्यांचे स्मरण ठेवायला हवे. आता तुम्हाला देशासाठी बलिदानाची गरज नसून तुम्ही ज्या क्षेत्रात काम करता, तेथे उत्तम आणि प्रतिभावंत असण्याची आवश्यकता आहे. क्रांतिकारकांचे पुरोगामी, समाजवादी, स्वतंत्र भारताचे स्वप्न सत्यात आणण्यासाठी विज्ञाननिष्ठ, विवेकवादी, सहिष्णू समाज निर्माण होण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन व प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी आभार मानले.

केसरी पुणे, २६ ऑगस्ट २०१८

# समर्थ, समृद्ध, विकसित भारतासाठी प्रयत्न करा : लक्ष्मीकांत देशमुख

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** स्वातंत्र्योत्तरीत भारत सत्तरीत असला तरी वयोमानानुसार भारत तरुणांचा देश असल्याने या देशाच्या सुवर्णयुगाचे स्वप्न साकार करण्यासाठी तरुणांनी समर्थ, समृध्द आणि विकसित भारताचे निर्माण करण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याची गरज अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केली. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात राजगुरुंच्या शतकोत्तर दशकपूर्ती जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते.

या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, 'स्वराज्य रक्षक संभाजी' फेम देवेश मेदगे, प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ.संजय शिंदे, प्रा.बापुसाहेब चौधरी, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रा.अशोक थिगळे आणि विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

लक्ष्मीकांत देशमुख पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी राजगुरूंसारख्या हुतात्म्यांचे स्मरण ठेवायला हवं. आता तुम्हाला देशासाठी बलिदानाची गरज नसून तुम्ही ज्या क्षेत्रात काय करता तेथे उत्तम आणि प्रतिभावंत असण्याची आवश्यकता आहे. क्रांतिकारकांचे पुरोगामी,



समाजवादी, स्वतंत्र भारताचे स्वप्न सत्यात आणण्यासाठी विज्ञाननिष्ठ, विवेकवादी, सहिष्णू समाज निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली.

समाजातील वाढत्या जातीय संघर्षावर भाष्य करताना बऱ्याचदा राजकीय पक्ष मतांच्या राजकारणासाठी जातीयतेचं, धर्मांधतेचं विष पेरत असून तरुणांनी हा धोका ओळखून विधायक शक्तीने बंधुभाव वाढीस लावायला हवा. राजगुरुनगर वासियांना हुतात्मा राजगुरुंच्या भूमीत राहण्याचे भाग्य अपघाताने मिळाले असून या संधीचं सोनं करताना इतरांपेक्षा जास्त देशभक्ती व समाजाची बांधिलकी मानून काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ.संजय शिंदे यांनी तर आभार प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील यांनी मानले.

**प्रभात** पुणे, रविवार, दि. २६ ऑगस्ट २०१८

# वयोमानानुसार भारत हा तरुणांचा देश

## लक्ष्मीकांत देशमुख : राजगुरू महाविद्यालयात हुतात्मा राजगुरुंना अभिवादन

राजगुरुनगर, दि. २५ (प्रतिनिधी) - स्वातंत्र्योत्तरीत भारत सत्तरीत असला तरी वयोमानानुसार भारत तरुणांचा देश असल्याने या देशाच्या सुवर्णयुगाचे स्वप्न साकार करण्यासाठी तरुणांनी समर्थ, समृद्ध आणि विकसित भारताचे निर्माण करण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याची गरज अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केली.



राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित अभिवादन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख.

राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात राजगुरुंच्या शतकोत्तर दशकपूर्ती जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात देशमुख बोलत होते. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक कोंडीभाऊ टाकळकर, स्वराज्य रक्षक संभाजी फेम देवेश मेद्रो, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. जी. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. बापुसाहेब चौधरी, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रा. अशोक शिंगळे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

लक्ष्मीकांत देशमुख म्हणाले की, विद्यार्थ्यांनी राजगुरु यांच्या सारख्या हुतात्म्यांचे स्मरण ठेवायला हवे. आता तुम्हाला देशासाठी बलिदानाची गरज नसून तुम्ही ज्या क्षेत्रात काम करता तेथे ठाम आणि प्रतिभावंत असण्याची आवश्यकता आहे. क्रांतिकारकांचे पुरोगामी, समाजवादी, स्वतंत्र भारताचे स्वप्न सत्यात आणण्यासाठी विज्ञाननिष्ठ, विवेकवादी, सहिष्णू समाज निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली. समाजातील वाढत्या जातीय संघर्षावर भाष्य करताना सत्ताधारी राजकीय पक्ष मतांच्या राजकारणासाठी जातीयतेचे, धर्मांधतेचे विष पेरत असून तरुणांनी हा धोका ओळखून विधायक शक्तीने बंधुभाव वाढीस लावायला हवा. राजगुरुनगरवासियांना हुतात्मा राजगुरुंच्या भूमीत राहण्याचे भाग्य अपघाताने मिळाले असून या संधीचे सोने करताना इतरांपेक्षा जास्त देशभक्ती व समाजाची बांधिलकी मानून काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी तर प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख